crime

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-1)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर  **P.S.(ठाणे):** विश्रामबाग
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0352  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/12/2025 13:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 05/12/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/12/2025
**Time From (वेळेपासून):** 18:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/12/2025  **Time (वेळ):** 13:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 016
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/12/2025 13:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मयुरेश असोसिएट्स कार्यालयामध्य,454 शनिवार पेठ,पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निता चत्रभुज मिसाळ सहा. पोलीस आयुक्त ला.प्र.वि पुणे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822214414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री विनोद माणिकराव देशमुख | | | 1. 505सिंहगड दर्शन सोसायटी, वडगाव खुर्द, पुणे -41,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. भास्कर राजाराम पोळ | | | 1. सुश्रुत रेसिडेन्सी, बी-7,गजानन महाराज मंदिराजवळ,न-हेगाव, पुणे ,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु.दराच्या 200 नोटा व 500 रु दराचे नोटाप्रमाणे दिसणाया लहान मुलांच्या खेळण्यातील 500 रु दरांचे | 3,000,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी तारीख 06/12/2025

मी निता चत्रभुज मिसाळ, वय 46 वर्षे, व्यवसाय – नोकरी, पद, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो.नं. 9822214414

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 05/12/2025 रोजी 09.30 वा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असताना प्रशासन अधिकारी श्री. दयानंद गावडे, पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि, पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार श्री. रविंद्र लक्ष्मण ब-हाटे, वय 61 वर्ष, व्यवसाय – बिल्डर, रा. फ्लॅट नं. 100, प्लॉट नं. 78, मधुसुधा अपार्टमेंट, लुल्ला नगर, बिबवेवाडी, पुणे -40 मो.नं. 7030353848 यांची लाच मागणी बाबत तक्रार असून, आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशीर कारवाई करा असे आदेशित केले व सदर कारवाई करीता तहसिल कार्यालय, वडगाव मावळ व जिल्हा परिषद, पुणे येथील प्रत्येकी एक पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगितले. आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवून जावून त्यांची तक्रार ऐकुन घेतली. 11.20 वा तहसिल कार्यालय, वडगाव मावळ येथील पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात आले. त्यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी श्री. रामराव शंकरराव बाचेवाड, पद- ग्राम महसुल अधिकारी, तहसील कार्यालय, वडगाव मावळ,जि.पुणे असे असल्याचे सांगितले. त्यानंतर 13.20 वा जिल्हा परिषद, पुणे येथील पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात आले. त्यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी श्री संदिप जगन्नाथ पवार, पद-जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे असे असल्याचे सांगितले. त्यांची तक्रारदार रविंद्र ब--हाटे यांचेशी ओळख करुन दिली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांची तक्रार सांगितली. त्यामध्ये तक्रारदार हे व्यवसायाने बांधकाम व्यवसायीक असून, त्यांची मयुरेश्वर असोसिएट्स या नावाने फर्म आहे. सन 2005 मध्ये एकता सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत या संस्थेचे सभासद युवराज कोतवाल, अँड. सुभाष तेजपाल अगरवाल, सचिव गंगाधर बकरे व सुधाकर खवले हे त्यांचेकडे आले व त्यांनी प्रस्ताव दिला होता की, त्यांची एकता सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत ही संस्था असुन त्याचे एकुण 37 सभासद आहेत. सदर संस्थेचे नावे सर्व्हे नं. 10/1 अ/2/3/4 क्षेत्र 1 हेक्टर 1 आर म्हणजेच 1 लाख 1 हजार चौ.फुट, गाव धनकवडी, जि. पुणे ही मिळकत आहे. त्यामधील 33 सभासदांनी त्यांना प्रत्येकी 4,95,000/- डिमांड ड्राफ्टने दिल्यास ते त्यांचा हक्क विकण्यास तयार आहेत. तेव्हा तक्रारदार व 32 सभासद असे एकत्रित येवुन जुने सभासदांचे नावे प्रत्येकी रू. 4,95,000/- देवुन त्या 33 सभासदांचे हक्क विकत घेतले. त्यानंतर संस्थेच्या झालेल्या बैठकीमध्ये 37 पैकी 33 सभासदांनी ठराव मंजुर करुन तक्रारदार यांना सचिव पदावर व श्री. सुधाकर खवले यांना अध्यक्ष पदावर निवडून दिले. त्यानंतर तक्रारदार यांनी स्वत:ची व सुधाकर खवले यांचे 7/12 सदरी संस्थेचे अध्यक्ष व सचिव म्हणुन नोंद करुन घेतली. त्यावर संस्थेचे एक सभासद कै.रामचंद्र साठे यांचा मुलगा श्री. राजेंद्र साठे यांनी मंडळ अधिकारी खेड शिवापुर यांचेकडे फेरफार रद्द करण्याची विनंती केली. सदर अर्ज मंडळ अधिकारी यांनी चौकशी करुन फेटाळुन लावला. सदर निर्णयाविरुद्ध श्री.राजेंद्र साठे यांनी प्रांताधिकारी, पुणे शहर यांचे न्यायालयात अपील दाखल केले. तसेच

सहकार न्यायालय, स्वारगेट, पुणे येथे देखील अपील दाखल करुन तक्रारदार व सुधाकर खवले यांनी अध्यक्ष व सचिव म्हणुन कामकाज पाहण्यास स्थगिती घेतली. तसेच राजेंद्र साठे यांनी मा. उच्च न्यायालयात वकिलपत्र दाखल केले. मा. उच्च न्यायालयामध्ये सुनावणी होवून सदरची संस्था पुनर्जिवित करुन संस्थेचा नोंदणी दाखला दिला.

सन 2020 मध्ये प्रांत, पुणे शहर यांनी राजेंद्र साठे यांचेविरोधात निकाल दिला. त्यादरम्यान तक्रारदार हे औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथे असताना त्यांची पत्नी सौ. संगिता ब-हाटे व मित्र अविनाश पायगुडे यांचेकडून समजले की, संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. बी.आर.पोळ, संस्था निबंधक कार्यालय यांची नियुक्ती झालेली असून, ते संस्थेच्या वतीने कामकाज पाहत होते. त्यानंतर तक्रारदार यांनी ते कारागृहात असताना पत्नी व मित्र अविनाश पायगुडे यांचे मार्फतीने दि.12/01/2023 नमूद असलेला अर्ज बी.आर. पोळ यांना दिला. त्यानंतर संस्था विसर्जीत होऊन लिक्वीडेटर श्री. देशमुख साहेब (पुर्ण नाव माहित नाही) यांची नियुक्ती झाली.

ऑगस्ट 2025 मध्ये तक्रारदार जामीनावर बाहेर आले व ते सप्टेंबर 2025 मध्ये संस्था निबंधक कार्यालय, मार्केटयार्ड येथे जावुन डी.डी.आर. श्री. हौसरे व त्याच कार्यालयातील प्राधिकृत अधिकारी बी.आर.पोळ यांची भेट घेवून यापुर्वी केलेल्या अर्जाची व सभासदांनी शेअर सर्टिफिकेट ट्रान्स्फर करण्याबाबत केलेल्या अर्जाबाबत विचारणा केली. तेव्हा त्यांचा अर्ज फेटाळुन लावला असल्याचे व जागा बांधकाम व्यावसायीकाला विक्री करुन संस्था विसर्जित करणार आहेत. डी.डी.आर.श्री. हौसरे यांनी लिक्वीडेशन प्रोसेजरकरीता देशमुख साहेब यांची नियुक्ती केली असल्याचे सांगून शेअर्स सर्टीफिकेटसाठी बी.आर पोळ यांना भेटण्यास सांगितले.

त्यानंतर दिनांक 01/12/2025 रोजी बी.आर. पोळ हे तक्रारदार यांचे कार्यालयात आले व सांगितले की त्यांनी लिक्वीडेटर विनोद देशमुख यांनी ठरविले आहे की, नवीन 33 सभासदांना शेअर सर्टिफिकेट ट्रान्स्फर करुन देणार आहोत त्याकरीता 33 सभासदांचे अर्ज आणुन द्या. त्यानंतर दुस-या दिवशी बी.आर.पोळ हे 20 अर्जाचा सेट घेवून तक्रारदार यांचे कार्यालयात आले. तेव्हा बी.आर.पोळ यांनी तक्रारदार यांना एक फॉर्म सॅम्पल म्हणून भरुन दिला व शेअर सर्टिफिकेट हस्तांतरण करण्याकरीता पोळ यांनी स्वत: व देशमुख साहेबासाठी 3 कोटी रुपयाची मागणी करुन 30 लाख रुपये अँडव्हान्स म्हणून आणण्यास सांगितले. तसेच शेअर सर्टिफिकेट जारी झाल्यानंतर संस्थेच्या जमीनीचे व्हॅल्युएशन 20-22 कोटी काढून लिलाव प्रक्रीया राबवून तक्रारदार हे सांगतील त्या व्यक्तीचे नावे सेटींग लावून टेंडर मंजुर करण्याकरीता ऑडिटरला व लिलाव प्रक्रीया राबविणारे अधिकारी व कर्मचारी यांना 5 कोटी रुपये द्यावे लागतील असे सांगून एकुण 8 कोटी रुपये रक्कम ही कोणतीही शासकीय फि नसुन लाच रक्कम असल्याने त्यांचेवर लाप्रवि मार्फत कारवाई करावी. अशी तक्रार सांगितली. तेव्हा तक्रारदार यांनी ते इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेले असल्याने त्यांना मराठी व्यवस्थीत लिहिता येत नसल्याचे सांगून त्यांनी त्यांचा अर्ज संगणकावर टंकलिखीत करुन घेण्याची विनंती केली. त्याप्रमाणे तक्रारदार यांची तक्रार त्यांनी कथन केल्याप्रमाणे पो. हवा.जाधव यांचे मार्फतीने संगणकावर मराठीत टंकलिखीत केली. तक्रार संगणकावर टाईप झाल्यानंतर तिची प्रिंट काढली. सदर तक्रारी अर्जावर तक्रारदार, पंच व आम्ही वाचून त्यावर सह्या केल्या. तसेच तक्रारदार यांनी अर्जासोबत हजर केले कागदपत्रावर देखील तक्रारदार, पंच व आम्ही सहया केल्या. नमूद पडताळणी व सापळा कारवाईकामी पंच क्र 1 म्हणून श्री. संदिप जगन्नाथ पवार व पंच क्र. 2 म्हणून श्री. रामराव शंकरराव बाचेवाड हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

तक्रारदार यांचेकडे श्री. पोळ यांनी कधी भेटण्यास बोलाविले आहे याबाबत विचारणा करता, त्यांनी सांगितले की, श्री. बी.आर.पोळ हे माझ्या मयुरेश असोसिएटस् या कार्यालयात आज रोजी भेट घेण्यास येणार असल्याचे सांगितले. तेव्हा मी पडताळणी करता तक्रारदार यांना त्यांचे खाजगी कार्यालयात पाठवून पडताळणी करणार असल्याचे सर्वांना सांगितले. त्यानंतर मी आमचेकडील साहित्यामधून सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढून त्याचे मेमरी स्लॉटमध्ये पुर्वीचे कोणतेही मेमरी कार्ड नसल्याची खात्री करुन दिली. तसेच व्हाईस रेकॉर्डर चालू बंद व इतर कार्यक्षणतेबाबत माहिती दिली. आमचेकडील नवीन सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिलंबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस Sandisk Ultra 32GB C10 A1 Micro SD 1U HC I व त्याचे मागील बाजुस MMC32GB7THL-A7OY AX215FE2507 MADE IN TAIWAN असे छापलेले होते. सदरचे मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घालून त्यामध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईवेळी नोंद करण्यात येणारे निवेदन हे व्हिडीओ चित्रीकरण करुन करण्यात येणार असल्याचे कळविले. त्यानंतर त्यांचेकडील साहित्यामधून नवीन सॅनडिस्क कंपनीचे 64 जीबी क्षमतेचे सिलंबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस Sandisk Ultra 64GB C10 A1 Micro SD 1U HC I व त्याचे मागील बाजुस 5047DCHN904P BN MADE IN CHINA असे छापलेले होते ते ला.प्र.वि.कडील सोनी कंपनीचे शासकीय व्हिडीओ कॅमेरामध्ये टाकून तक्रारदार पंच क्र.01 व 02 यांचे पडताळणी कार्यवाही करीताची निवेदने ध्वनिमुद्रीत

केली ती वेळ 13.47 ते 13.52 वा ची होती.
त्यानंतर मी तक्रारदार श्री ब-हाटे यांना लोकसेवक श्री. बी.आर.पोळ, लोकसेवक श्री. देशमुख यांच्याकडे पाठवून तक्रारदार यांचेकडे लोकसेवक त्यांचे शासकीय कामाकरीता लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी करीता तक्रारदार, पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पडताळणीची पुढील कारवाई करीता तक्रारदार यांना त्यांचे खाजगी वाहनाने पाठवून देऊन त्यांचे पाठोपाठ सापळा पथक जाण्याचे तसेच सापळा पथकाने तक्रारदार यांच्या खाजगी कार्यालयाचे दुस-या मजल्यावर असणारे हॉलमध्ये पुढील कार्यवाहीची वाट पाहत बसण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे व्हाईस रेकॉर्डर 14.28 वाजता चालू करून तो पो.हवा.जाधव यांचे मार्फतीने तक्रारदार श्री.ब-हाटे यांनी परिधान केलेल्या शर्टचे आत असणारे बनियनच्या आतील डावे बाजूस सेफटी पिनच्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. पवार यांचेसोबत तक्रारदार यांची दुचाकी वाहन टी.व्ही.एस.ज्युपीटर नं.एम.एच. 12 वाय.डी. 1886 या वाहनाने रवाना केले. मी व सापळा पथक असे शासकिय वाहन इर्टिगा क्र. एम. एच. 12 यु.सी. 4109 ने पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे स्टेशनरी साहीत्य, लॅपटॉप, हेडफोन, काळे पडदे, अँथ्रासिन पावडर, व्हीडीओ रेकॉर्डर त्यात मेमरी कार्ड, रू. 30,00,000/- रक्कम होईल एवढ्या खेळण्यातील नोटा व इतर साहित्य घेवून अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातुन रवाना होवून तक्रारदार यांच्या शनिवारपेठ येथील कानडेवाडा येथील मयुरेश असोसिएट्स या कार्यालयात पोहोचलो. तक्रारदार हे त्यांचे दुचाकीवरून उतरून पंच क्र. 1 यांचेसह त्यांचे कार्यालयात गेले. तरेच मी, सापळा पथक पंच क्र. 2 याचेसह तक्रारदार यांच्या कानडे वाडा येथील कार्यालयाचे दुस-या माळयावर असणारे हॉलमध्ये जाऊन थांबलो.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी पो.हवा.जाधव यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून तो माझेकडे दिला, तो मी बंद करुन माझेकडे ठेवला ती वेळ 14.57 वा.ची होती. त्यानंतर पंच क्र.2 यांचे समक्ष पंच क्र.1 श्री पवार यांना ते गेल्यापासुन परत येईपर्यंत हकिकत विचारली असता त्यांनी सांगितले की, ते व तक्रारदार असे तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयातून दुचाकी वाहन टी.व्ही.एस.ज्युपीटर नं.एम.एच. 12 वाय.डी. 1886 हीवरून शनिवारपेठ येथील तक्रारदार यांच्या कानडे वाडा येथील कार्यालयाजवळ गेलो तेथे तक्रारदाराची दुचाकी पार्कींगला लावून तक्रारदाराचे तळमजल्यावरील कार्यालयात गेलो. तेथे गेल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून लोकसेवक श्री. पोळ यांना त्यांचे मोबाईलवर कॉल करून स्पिकर ऑन केला त्यावेळी समोरील लोकसेवकास त्यांनी कोठे आहे अशी विचारणा केली तेव्हा त्यांनी ते खडकी येथे गेले असल्याचे सांगितले त्यानंतर लोकसेवक श्री. पोळ यांनी तक्रारदारांना साडेपाच पर्यंत आले तर चालेल का असे विचारलेत्यावर तक्रारदारांनी निघताना फोन करा असे लोकसेवक श्री. पोळ यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी आपण  थांबलेल्या ठिकाणी आलो. अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगितली त्यानंतर तक्रारदार यांना घडलेली हकिकत विचारणा केली असता तक्रारदार यांनी पंच क्र. 1 श्री पवार यांचेप्रमाणेच मिळती जुळती हकिकत सांगितली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डींगमधील ध्वनिमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगिलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री झाली. त्यानंतर तक्रारदार यांच्या कार्यालयाचे दुसरे माळयावरील हॉलमध्ये थांबलेलो असताना तक्रारदार श्री. ब-हाटे यांना त्यांचा मोबाईल नंबर 7030353848 यावर लोकसेवक श्री. पोळ यांचा मोबाईल नंबर 8888108493 यावरुन कॉल आला तो व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरले त्याकरीता पो.हवा.जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरचे रेकॉर्ड बटण दाबून व्हाईस रेकॉर्डर चालु केला परंतु फोन उचलेपर्यंत तो कट झाला त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून मोबाईल नंबर 8888108493 यावर कॉल केला असता लोकसेवक श्री. पोळ हे मी निघालोय असे म्हणाले त्यावर तक्रारदारांनी अंदाजे किती वेळ लागेल हे विचारले त्यावर श्री. पोळ यांनी अर्धा तास लागेल असे कळविले आहे  सदरचा कॉल हा व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला.
आम्ही सर्वाना सुचनांची उजळणी करुन दिली व 17.30 वाजता व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो पो.हवा.जाधव यांचे मार्फतीने तक्रारदार श्री. ब-हाटे यांनी परिधान केलेल्या शर्टचे आत असणारे बनियनच्या आतील डावे बाजूस सेफटी पिनच्या सहाय्याने लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री. पवार यांचेसोबत तक्रारदारांच्या कार्यालयाचे दुस-या मजल्यावरून तळमजल्यावर असणारे मुख्य कार्यालयात रवाना केले व आम्ही तेथेच थांबून राहिलो.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पो.हवा.जाधव यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून तो पोलीस उपअधीक्षक निता मिसाळ यांचेकडे दिला तो त्यांनी बंद करुन त्यांचे ताब्यात ठेवला ती वेळ 17.56 वा.ची होती. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक निता मिसाळ यांनी पंच क्र.2 यांचे समक्ष पंच क्र.1 श्री पवार यांना ते गेल्यापासुन परत येईपर्यंत हकिकत विचारली असता त्यांनी सांगितले की, ते तक्रारदार यांच्यासह चालत तक्रारदारांच्या तळ मजल्यावरील कार्यालयात जाऊन थांबले असता थोडयाच वेळात एक इसम तक्रारदाराच्या कार्यालयात आला त्याचेशी तक्रारदार यांनी बोलणी सुरू केली तेव्हा मला

तो बी.आर.पोळ असल्याचे समजून आले.सदरील इसम हे तक्रारदार यांचे केबीनमध्ये आले व तक्रारदार यांचे समोर असणारे खुर्चीवर बसले तक्रारदार यांनी माझी त्यांचेशी ओळख करून देताना ते पोळ साहेब प्राधिकृत अधिकारी, एकता सोसायटी अशी ओळख करून दिली. तसेच कामासंदर्भात बोलणी करीत असताना पोळ हे करायचंय असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी लिहून घेण्याचा बहाणा केला आणि आता हे कोण करणार असे विचारले तेव्हा पोळ हे सोसायटी ...आम्ही करून देतो की.. असे म्हणाले.तेव्हा तक्रारदारांनी त्यांना म्हणजे तुम्ही करणार का असे विचारले तेव्हा श्री. पोळ यांनीआम्ही आम्ही ...करुन देतो ना असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार श्री. ब-हाटे यांनी श्री. पोळ यांना पणं तुम्ही आता आहे तिथं असे विचारले त्यावर ते हो असे म्हणाले. त्यावेळी श्री. पोळ यांना फोन आला व रेंज नसल्याने फोन कनेक्ट झाला नाही त्यानंतर श्री. पोळ यांनी साहेबांचा फोन आहे असे म्हणाले त्यावर तक्रारदार श्री. ब-हाडे म्हणाले की, साहेब देशमुख साहेब ...2 मिनिट त्यांना म्हणावं एक दोन मिनीट भेटतील का? मॅझीमम किती पिरीयड विचारतात असे विचारले त्यावर श्री. पोळ हे दोन महिन्यात करून देतो की एक दोन हेअरींगमध्ये संपुन जाईल. त्यानंतर तक्रारदार यांनी त्याचा नंतर शेअर ट्रान्सफर करणार म्हणजे काय...हयांच म्हणणं ये....कारण सुरवातीला तेथील सभासद जुने जे होते ओरीजनल ते जावुन माझ्या ओळखीचे 33 सभासद आले त्याच्या नंतर प्रकाश जैन चे 10 लोकं त्याच्यात राहिले आणि उरलेली 23 लोकं चेज झाली मग तुम्ही शेअर सर्टिफिकेट आता डायरेक्ट जे चालु सभासद ये असे विचारले तेव्हा श्री. पोळ नाय नाय डायरेक्ट नायअसे म्हणाले तेव्हा तक्रारदारांनी त्यांना मग कसं करणार असे विचारले तेव्हा श्री. पोळ यांनीस्टेप घेवुन लिंक वरून ए.बी.सी.डी त्यांची नावं घेवुन त्याला आळं करुन आपला साता बारा कसं असतो तसं सेम तसं होत असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार यांनी जे 33 सभासद घेतले होते त्यांच्या नोंदी होणार असे विचारले तेव्हा श्री. पोळ हे नोदं घ्यायची ना असे म्हणाले तेव्हा तक्रारदार त्यांना ते नाय शेअर सर्टिफिकेट असे म्हणाले.श्री. पोळ हे ते आणं कोण इथलं ...ते त्याची नावं असे म्हणाले त्यावर तक्रारदारांनी विचारले की, ठिकेय ओके ...नंतर ...त्याचा महत्वाचा प्रश्न असा ये कि जर शेअर सर्टिफिकेट ट्रान्सफर होणार असतील टप्पा ...टप्प्याने तर मग ऑक्शन ची गरजं काय...त्या प्रोजिझरला आपण का चाललोय त्यावर श्री. पोळ ती लिक्वीडेशन ती ...ऑक्शन करायची  म्हणजे ती सोसायटी नियमात चालली नाय चालली एवढया वर्षे आत्ता पर्यंत किती वर्षे झाली तीन वर्षे तुमचं ऑडीट नाय केलं मीटींग नाय झाल्या असे म्हणाले. श्री ब-हाटे यांनी ऑक्शन करून जे पैसे येणार ते कुठं जमा होणार असे विचारले. तेव्हा श्री. पोळ हे सोसायटीला ...ते मेंबर लोकांमध्ये डिव्हाईड करुन असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार व श्री. पोळ यांचेत सोसायटी संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर तक्रारदार यांनी एक सेकंद मी लिहून घेतो असे म्हणाल्यानंतर श्री. पोळ हे तीन कोटी असे म्हणाले त्यानतर तक्रारदार श्री. ब-हाटे तीन कोटीतले... तीस लाख अँज अ अँडव्हान्स अगेंस्ट तीन करोड बरोबर असे म्हणाले. त्यावर श्री. पोळ हम्म.. आता हे ह्यांच्या मधी नाय घ्यायच असे म्हणाले त्यावर श्री. ब-हाटे पोळ यांना म्हणाले की, नाही. नाही. आहो हे वैतागले सारखी तीच तीच चर्चा ऐकुण... चार दिवस झाले. हे सगळ त्याच्या ऑफीसमध्ये हे ऑडीटर /अकाउंटंट काम बघतात. तर तीन कोटी हे काय दयायचे नाही फक्त मला चार वेळा मला विचारतील असे म्हणाले तेव्हा तक्रारदार हे कागदावर लिहून घेत होते म्हणून श्री. पोळ त्यांना उद्देशुन ते नका लिहू तोंडी सांगा त्यांना असे म्हणाले तेव्हा तक्रारदार त्यांना ते माझय ना मी त्यांना सांगील...फाडून टाकणारय मी काय तो प्रॉब्लेम नाही.. ह्याच तीन करोडमध्ये आपले शेअरचे सर्टीफिकेट ट्रान्सफर करून देणारय....ह्याला कालावधी किती लागेल असे म्हणाले.त्यावर श्री. पोळ यांनी कशाला असे विचारले तेव्हा तक्रारदारांनी त्यांना या शेअर्स सर्टीफिकेटला असे विचारले तेव्हा श्री. पोळ यांनी ते काय माझ्या सहीने केलय मी उदया करून देईल मी असे म्हणाले व पुढे आठ दिवस दया असे म्हणाले त्यावर तक्रारदार विदइन ऐट डेज आणि ऑक्शनची प्रक्रिया कधीपासून सुरू होणार असे म्हणाले तेव्हा श्री. पोळ हे तुम्ही दिली की त्यानंतर सुरू काम आमचं असे म्हणून लाच रक्कमे संदर्भात बोलले तेव्हा तक्रारदार त्यांना हे काय देतोय ना.. तर ऑक्शनची प्रक्रिया कधीपासून सुरू होणार. असे म्हणाले त्यावर श्री पोळ यांनी त्यांना उदयापासून चालु होणार असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी प्रशासक म्हणून कधी नेमणुकीस होता हे विचारले व नंतर प्रशासक म्हणून काम करीत असताना तुम्ही काय केल... तुमच कार्य काय होतं... असे विचारले त्यावर श्री. पोळ हे सोसायटी रन करायची..त्यांचे काही प्रॉम्लेम ते.. असे म्हणाले त्यानंतर तक्रारदारांनी श्री. पोळ यांना देशमुख साहेबांचे पुर्ण विचारून घेतले ते त्यांनी विनोद देशमुख असे सांगितले. त्यांनी लिक्वीडेटर का असे विचारले त्यावर श्री. पोळ हे हं.. लिक्वीडेटर असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार श्री. ब-हाटे यांनी पोळ यांना बर आता तीन कोटी आपली डिमांडय त्याच्यातील तीस लाख रूपये होतायत का टोटल 8 कोटीतले 30 लाख घेताय ना आफटर पेमेंट फ्रोम टुमारो ओके माझ्या नावाची जी ऐन्ट्री झाली ते चेअरमन सोसायटी ...माझी आणि खवले काकांची ती तशीचें ठेवणारे का ती रद्द करणारेय असे म्हणाले. तेव्हा श्री. पोळ हे ती नाय आता येणार त्यात ..आता हयाला कवर करु की असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार श्री. पोळ यांना हया पुढचे 5 कोटी जे दयायचेत त्याचे काय अँडव्हान्स दयावे लागतील का हया तीस लाखातच अँडव्हान्स मध्ये हे ठरणार असे म्हणाले.

त्यावर श्री. पोळ हे नाय हय हया तीस नाय..... ते....नाई ... फिक्स नाई असे म्हणाले तेव्हा तक्रारदार श्री. बोहाटे
यांनी ते काय म्हटलं ....ते काय म्हटलं रविशेट रक्कम आम्ही 08 कोटी ठेवतो रिस्क नकोय कागदावर दिले 80
कोटी भिती नाय वाटतं....ते म्हटल्या प्रमाणे म्हणुन कॅश मध्ये देतोय ...आपल्याला क्लॅरिटी पाहिजे असे म्हणाले.
तेव्हा श्री. पोळ यांना बघु ना आपण ते ...सिच्युयेशन पाहुन ही करायचं असे म्हणाले. त्यानंतर श्री.ब-हाटे हे श्री.
पोळ यांना थोडीशी कल्पना काय कमी जास्त सांगा...पण काहीतरी सांगायला लागलना.... पाच कोटी ऑक्शनची
प्रक्रिया चालु केल्यानंतर....जशी तीन कोटीची प्रक्रिया तीस लाख...तशी पाच कोटी पेक्षा किती मागणी... असे
म्हणाले त्यावर श्री. पोळ हे एकदा एक ची डिमांड होईल...किंवा पन्नास पण होईल... असे म्हणाले. त्यावर श्री. बो-
हाटे यांनी पन्नास लाख किंवा एक कोटी असे विचारले. तेव्हा श्री.पोळ हे एक धरून चला...आम्ही त्याचही काय
करणार नाय पण ज्यावेळी लेटर मिळल त्यावेळेस ऑक्शन होईल त्यावेळी .. तुम्हाला दयावच लागणार असे
म्हणाले. त्यानंतर तक्रारदारांनी हा... आणि ऑक्शनसाठी मी पाच नाव देणार... असे विचारले तेव्हा श्री. पोळ हम्म
असे म्हणाले. तक्रारदार यांनी बर.. पाच नाव दयायची का तीन नाव दयायची असे विचारले तेव्हा श्री. पोळ हे तीन
दया, चार दया, कितीही दया, तुमच्या हान असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी पेपरमध्ये ऑक्शनमध्ये देणार का
हे विचारले तेव्हा श्री. पोळ यांनी दोन पेपरला देणार असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना पेपरमधील जाहिरात
पाहून इतर लोक टेंडर टाकतील असे म्हणाले. तक्रारदार यांना घडलेली हकिकत विचारणा केली असता तक्रारदार
यांनी पंच क्र.1 श्री पवार यांचेप्रमाणेच मिळती जुळती हकिकत सांगितली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डींगमधील
ध्वनिमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगिलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर
असल्याची खात्री झाली व लोकसेवक पोळ यांनी स्वत: करीता व लोकसेवक श्री. देशमुख, लिक्वीडेटर यांच्याकरीता
शेअर्स सर्टीफिकेट देण्याकरीता रू.3,00,00,000/- लाच रक्कमेची मागणी करुन, पहिला हप्ता रु 30,00,000
/- रुपये लागलीच स्विकारण्याची तयारी दर्शविली.
तक्रारदार यांना श्री. देशमुख, लिक्वीडेटर यांच्याकडे पुढील पडताळणी बाबत विचारणा केली. तेव्हा तक्रारदार यांनी
श्री. पोळ यांनी त्यांचे करीता व लोकसेवक श्री. देशमुख यांच्याकरीता लाचेची मागणी केलली असून लाच रक्कम
स्विकारण्याची तयारी केलेली आहे. श्री. पोळ के लाच स्विकारण्यासाठी तक्रारदार यांच्या कार्यालयात बसून आहेत.
त्यामुळे जर त्यांना आता लाचेची रक्कम दिली नाही तर त्यांना संशय येईल. तसेच मागणी केलेली लाच रक्कम
स्विकारण्यासाठी श्री. देशमुख हे येणार असल्याने पुन्हा त्यांचेकडे लाचेची पडताळणी करणे शक्य नाही असे
तक्रारदार यांनी कळविलेले असून त्यांची इतर कोणाकडेही पडताळणी करावयाची नाही असे सांगितले त्यामुळे
तक्रारदार यांना श्री. पोळ व देशमुख यांच्याकडे पाठवून सापळा शक्यता अजमाविण्याचे सर्वानुमते ठरले. त्यामुळे
तक्रारदार यांना पुढील सापळा कारवाई करीता आवश्यक असणारे लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी
रू. 1,00,000/- रक्कम ही त्यांच्या बचतीतील शिल्लक असून ती कार्यालयातच उपलब्ध असल्याचे सांगून
कार्यालयातील दुस-या मजल्यावरील हॉलमधील कपाटातून रक्कम रू. 1,00,000/-रुपये रक्कम आमचे व
पंचासमक्ष हजर केली. त्यामध्ये 500/- रुपये दराच्या 200 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,00,000/- रुपये
असल्याचे दिसून आले. तसेच लोकसेवकांनी मागितलेली रक्कम ही खुप मोठी असून तेवढया रक्कमेची जुळवाजुळव
होणार नाही असे सांगितले. त्यामुळे रू. 500/- दराचे नोटांप्रमाणे दिसणा-या खेळण्यातील तक्रारीचे अनुशंगाने
सापळा पथकासोबत घेतलेल्या नोटांचे 58 बंडल त्याचे प्रत्येक बंडलमध्ये 100 नोटा असलेल्या आम्हा पंचांना व
तक्रारदार श्री. ब-हाटे यांना दाखविल्या. त्यानंतर पो.कॉ.आडके यांनी एका कागदावर पंचांसमक्ष तक्रारदार यांनी
हजर केलेल्या नोटांचे नंबर्स लिहुन घेतले. त्यावर समक्ष म्हणुन मी व दोन्ही पंचानी सह्या केल्या.
तेव्हा पंचामार्फत तक्रारदार यांचे पेहरावाचे निरीक्षण केले. आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या ताब्यातील सर्व
रोख रक्कम व चीजवस्तू समक्ष हजर केल्या. त्यानंतर पंच क्र 1 यांचेमार्फत तक्रारदार यांचे सर्वांगाची तपासणी केली
असता, तक्रारदार यांनी हजर केलेल्या चीजवस्तू व रोख रक्कमे व्यतिरीक्त इतर कोणतीही चीजवस्तू किंवा रोख
रक्कम मिळून आली नाही.
त्यानंतर पडताळणी कारवाईत वापरलेले मेमरी कार्ड हेच पुढील कारवाईकामी वापरण्याचे सर्वानुमते ठरले. तेव्हा
पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम" जप्त करण्याच्या
कारवाईचे लाप्रवि कार्यालयातील सोनी कंपनिचे शासकिय कॅमे-याने चित्रीकरण करण्यात येणार आहे. तसेच हे
चित्रीकरण पो.हवा.जाधव हे करतील असे सांगितले.

त्यानंतर मी दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना अल्ट्राव्हायोलेट दिवा (टॉर्च) व अँन्थ्रासिन पावडर दाखवून
कार्यवाहीतील त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले व प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर चा.पो.कॉ.
चंद्रकांत कदम यांनी लाचेकरीता सादर केलेल्या नोटांच्या बंडलचे दोन्ही बाजूस व लाल रंगाचे रेक्झीन बॅगेस
अँन्थ्रासीन पावडर लावली. चा.पो.कॉ.कदम यांनी आमच्या सुचनेवरुन सदर लाचेची रक्कम असलेली बॅग तक्रारदार

ब-हाटे यांच्या जवळ ठेवली. त्यानंतर चा.पो.कॉ.कदम यांना सापळा कारवाईमधून वगळून सदर ठिकाणाहून रवाना होऊन शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी जाऊन थांबण्याच्या सुचना दिल्या.
सापळा कारवाईचे अनुशंगाने व्हाईस रेकॉर्डर पो.हवा.जाधव यांनी चालु करून व व्हिडीओ रेकॉर्डर पो.कॉ.आडके यांनी चालु करून तक्रारदार, पंच क्र. 1 व 2 यांचे सापळा निवेदन घेतले. ती वेळ 18.33 ची होती. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. पोळ यांनी लोकसेवक श्री. देशमुख यांना बोलावून घेतो असे सांगितलेले असल्याने त्यांचीही सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी भेट घेऊन लोकसेवक श्री. देशमुख हे लाच मागणी करतात अगर कसे याबाबत पडताळणी करावी असे ठरविण्यात आले. दरम्यान स.पो.आ.श्री. दयानंद गावडे यांचेशी फोनवर संपर्क साधून अधिकचे मनुष्यबळ मागवून घेतले. त्याप्रमाणे स.पो.आ.श्री.सतीश वाळके, पो.हवा.किरण चिमटे, पो.कॉ. नागेश देशमुख, पो.कॉ.विशाल माने यांना उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार यांना अँन्थ्रासीन पावडर लावून ठेवलेली बॅग हातात घेण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे उजवे हातात अँन्थ्रासीन पावडर लावलेली बॅग उचलून घेतली.

त्यानंतर सपोआ मिसाळ यांनी पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्या अनुषंगाने सूचना दिल्या. तसेच लाच रक्कम स्विकारले नंतर इशारा मिळताच व्हिडीओ रेकॉर्डींग सुरु करणेबाबत पो.हवा. जाधव यांना सुचना दिल्या व लोकसेवकानी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी कार्यालयाचे बाहेर येवून डोळयावरील चष्मा डोक्यावर घेवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबत सुचित केले. सापळा पथकातील टीमधील सर्वांना काम समजावून सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर लोकसेवक श्री. पोळ यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यांनी परीधान केलेल्या शर्ट चे आतील बनयिन ला सेफटी पिन च्या सहाय्याने लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री. पवार यांचेसह 18.42 वाजता रवाना केले. त्यांचे मागून मी, पंच क्र 2 व सापळा पथक तक्रारदार यांचे कार्यालयाचे दुस-या मजल्यावरुन खाली येवून तक्रारदार यांचे कार्यालयासमोर असणारे वाहत्या रोडचे आजुबाजूला विखरुन वाट पाहत थांबून राहिलो. त्यादरम्यान सापळा कारवाईकामी दिलेली अधिक कुमक स.पो.आ. श्री. सतीश वाळके, पो.हवा.किरण चिमटे, पो.कॉ.नागेश देशमुख, पो.कॉ.विशाल माने हे त्या परिसरात आले त्यांना विखरुन थांबून राहण्याबाबत तसेच तक्रारदार हे लाच स्विकारल्यानंतर डोक्यावरील चष्मा काढून लाच स्विकारल्याचा इशारा देणार असल्याचे कळविण्यात आले. काही वेळानंतर तक्रारदार यांच्या कार्यालयाचे समोरील रस्त्यावर एक इर्टिगा कार नं. एम.एच. 12 आर.एफ.6526 ही गाडी उभी राहीली. त्यावेळी तक्रारदार, पंच क्र 1 व त्यांचेसोबत एक इसम असे कार्यालयातून बाहेर आले व गाडीतील इसमाने हातवारे करुन बोलावल्याने ते तिघेही गाडीजवळ आले व तक्रारदार गाडीचे ड्रायव्हर सिटचे बाजूस असले पुढील सिटवर बसले. पंच व इतर इसम मधल्या सिटवर बसले. थोडयावेळानंतर पंच क्र. 1 हे गाडीतून खाली उतरले व लागलीच तक्रारदार यांनी डोळयावरील चष्मा डोक्यावर घेवून लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. मी व पोशि आडके यांनी तक्रारदार यांचे जवळ जावून त्या ठिकाणी उभे असलेल्या पंच क्र.1 श्री पवार यांना लाच रक्कम कोणी स्वीकारली याबाबत पंच क्र. 2 यांचेसमक्ष विचारणा केली. तेव्हा पंचांनी ड्रायव्हर सीटवर बसलेल्या इसमाकडे व मधल्या सिटवर बसलेल्या इसमाकडे बोट दाखविले. तेव्हा आम्ही त्यांना गाडीचे खाली येण्यास सांगितले. पो.हवा.जाधव यांनी त्यांचेकडील व्हिडीओ रेकॉडींग चालु केले. पो.हवा.चिमटे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाइस रेकॉर्डर काढून तो बंद केला. त वेळ 18.55 वा ची होती. सापळा पथकातील स.पो.आ.श्री. वाळके व अंमलदार पो.कॉ.देशमुख, पो.कॉ.माने हे सद ठिकाणी पोहचले होते. पो.कॉ.आडके व पो.कॉ.देशमुख यांनी वाहनाचे मधल्या सिटवर बसलेल्या इसमाचे दोन्ही हा मगटाजवळ पकडले तसेच स.पो.आ.श्री. वाळके व पो.हवा.चिमटे यांनी ड्रायव्हर सिटीवरील चालकाचे दोन्ही हात मनगटाजवळ पकडले. दोघांना आम्ही आमचेकडील लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली व ओळखपत्र दाखवून स्वत:ची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पंच क्र.1 यांना लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता सदरची लाच रक्कम ड्रायव्हर सीटवरील इसमाने स्विकारून सीटवरील मागचे सिटवर बसलेल्या इसमाकडे दिली ती रक्कम त्यांनी गाडी सिटवर ठेवली अशी माहिती सांगितली. तेव्हा ड्रायव्हर सिटवरील इसमास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव विनोद माणिकराव देशमुख, वय 50 वर्षे, धंदा शासनाच्या सहकार विभागाकडून नेमणुक केलेले आवसायक, पत्ता- फ्लॅट नं. 505, सिंहगड दर्शन सोसायटी, वडगाव खुर्द, धायरी फाटा, पुणे व मधल्या सिटवर बसलेल्या इसमाने त्याचे नाव व पत्ता भास्कर राजाराम पोळ, वय 56 वर्षे, धंदा सरकारी पॅनलवरील ऑडीटर, पत्ता- सुश्रुत रेसीडेन्सी, बी-7, गजानन महाराज मंदिराजवळ, न-हेगाव, पुणे असे सांगितले. त्यानंतर पंच क्र. 1 यांना लाच रक्कम कोठे आहे याबाबत विचारणा केली असता पंच क्र. 1 यांनी एरटीगा गाडीचे ड्रायव्हर सिटचे मागील बाजूचा

दरवाजा उघडून मधल्या सिटवर असणारी लाल रंगाचे रेक्झीन बॅगेकडे बोट करून दाखविली. त्यानंतर पंच क्र. 1, 2 व सापळा पथकातील अधिकारी यांचे हातावर व कपडयांची तपासणी केली असता कोठेही अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली नाही. सदर गाडीचे आतील लाईट बंद करून अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश सदर लाल रंगाचे बॅगेवर व आतील नोटांवर प्रकाश टाकला असता त्यावर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर सदरची रक्कम असणारी बॅग ही पंच क्र. 2 यांचे ताब्यात दिली. श्री. विनोद देशमुख यांना इर्टिगा गाडीमध्ये घेऊन इर्टिगा गाडीमध्ये अंधार करुन त्यांचे हातावर अँन्थ्रासीन लाईटचा प्रकाश टाकला असता त्यांचे दोन्ही हातास अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर श्री. भास्कर पोळ यांना इर्टिगा गाडीमध्ये घेऊन अंधार केला व त्यांचे हातावर अँन्थ्रासीन लाईटचा प्रकाश टाकला असता त्यांचे दोन्ही हातास अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर तक्रारदार श्री. ब-हाटे यांना इर्टिगा गाडीचे अंधारात बोलावून घेऊन त्यांच्या दोन्ही हाताची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकून तपासणी केली असता तक्रारदार यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर व पे-यांवर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर पंच क्र. 2 यांचेमार्फत सापळापुर्व पंचनाम्यावेळी रू. 500/- दराच्या 200 नोटांचे लिहून घेतलेले नंबरचे यादीची व ताब्यात घेतलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता त्या तंतोतंत जुळून आले.

त्यानंतर सापळा पथकातील अंमलदारामार्फत घटनास्थळाची पाहणी केली पुर्वेस शनिवार वाडयाकडे जाणारा रस्ता, पश्चिमेस ओंकारेश्वर मंदीराकडे जाणारा रस्ता, दक्षिण बाजूस विनायक ज्वेलर्स व परांजपे ऑप्टीकल्स अशी नावाची दुकाने, उत्तर बाजूस नवीन बांधकाम सुरू असलेले अशी चतु:सिमा असुन कच्चा नकाशा काढून घेतला. सदर कच्च्या नकाशाच्या कागदावर आम्ही पंचांनी व समक्ष म्हणून सपोआ निता मिसाळ यांनी सही करुन सदर कच्चा नकाशा ताब्यात घेतला.

सापळा घडले ठिकाण हे रहदारीचे रस्त्यावरील असल्याने व सापळा कारवाईमुळे हळुहळु रहदारीस अडचण निर्माण होत असल्याने तसेच त्या ठिकाणी पुरेसी जागा उपलब्ध नसल्याने त्याच ठिकाणी पुढील कारवाई करणे सोयीचे वाटत नसल्याने तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे चे कार्यालय जवळ असल्याने पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे येवुन करण्याचे सर्वानुमते ठरविल्याने आम्ही लाप्रवि कार्यालयात येवुन पुढील कारवाई केली.

आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकीगतीबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, मी व पंच असे माझे कार्यालयाचे वरील दुस-या मजल्यावरुन खाली तळमजल्यावरील कार्यालयात आलो. तेव्हा लोकसेवक बी.आर. पोळ हे कार्यालयात आले. त्यानंतर मी, पंच क्र 1 व श्री. पोळ असे कार्यालयातून बाहेर आलो. तेव्हा श्री. पोळ हे रस्त्याचे दुसरे बाजूस उभ्या असलेल्या इरटीगा कारकडे गेले. तेव्हा श्री. पोळ यांनी आधी सांगितलेवरुन ती व्यक्ती ही लिक्वीडीटर देशमुख हीच असल्याची माझी खात्री झाली. त्यानंतर श्री. देशमुख यांनी मला हाताने इशारा करुन कारकडे बोलाविले. मी व पंच असे लगेच लोकसेवक यांचे इरटिगा कारकडे गेलो व कारचे पुढील डावे बाजूचे सिटवर जावून बसलो. त्यावेळी पंच क्र 1 व श्री. पोळ हे कारचे मधल्या सिटवर जावून बसले. तेव्हा आमचेमध्ये इतर संभाषण झाले. त्यावेळी मी 'नाही माझ्या शब्दावर काय-- मार्केटमध्ये माझ नाव टिकुनय. आता माझ्या शब्दावर पहिली गोष्ट तर त्यांच म्हणण पडल की, 8 कोटिची मागणी खूप झाली....जास्त झाली' असे बोललो. त्यावर देशमुख यांनी 'हा मग' असे विचारले. त्यावर मी 'एक दोन कोटी रु. मागणी असती तर आपण दिली असती. मी त्यांना सांगितल जमीन मोठी आहे' असे बोललो असता, देशमुख यांनी 'बरोबर' असे बोलले. तेव्हा मी 'गुंतागुंत मोठी आहे. हाचा मुळ त्यांची मगणी 4 कोटिंचीए ती पण ते काय एक रकमी मागत नाहीत म्हटल. बरोबरय की नाही.' असे विचारले. त्यावर देशमुख हे 'बरोबर' असे म्हणाले. त्यानंतर मी 'आता तुमच्याकडन फक्त --- हे अकाऊंटटय त्यांचे (पंचानां उद्देशुन) फक्त तुमच्याकड त्यांना दोन शब्द सांगा की किती कालावधीत होईल काम आणि' असे बोललो. तेव्हा देशमुख यांनी 'तुमच्या पुढ हे केल ना आपण. आजच पेपर वर्क केल ना. आम्ही कामालाच लागतो लगेच' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'बरोबरय' असे म्हणालो. तेव्हा देशमुख हे 'मी यांच्या सोबतचय, पोळ साहेबांच्या' तेव्हा मी 'पोळ साहेबांच्या, हो, हो' असे म्हणालो. त्यावर देशमुख यांनी 'डायरेक्ट कस होतय, मी पुढ आलो ना मग साहेब लोकांच मन हे झाल.... जावा हे परस्पर काय करायलेत, माझ्याबद्दल थोड त्यांना निगेटीव्ह जाईल... अन त्यांच्या पुढयेत.' असे म्हणाले. तेव्ही मी त्यांना 'बर बर हरकत नाय. मला त काय प्रॉब्लेम नाही पण हौसारे साहेब कनफर्न करतील का' असे विचारले. तेव्हा देशमुख 'कनव्हिन्स होतील कनव्हिन्स होतील ना' असे म्हणाले. त्यावर मी 'तुम्ही जे रिपोर्ट वगैरे करणार त्यात हौसारे साहेब' असे बोललो. त्यानंतर देशमुख हे 'हो हो कनव्हिन्स करुन घेवुन त्यात काय अडचण नाही' असे म्हणाले.त्यानंतर मी 'म्हणजे बोलणी झालीय ना तुमच्या बरोबर' असे विचारले. त्यावर देशमुख हे ' झालीय' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 'कसय, उद्या

फेल गेले तर' असे म्हणालो. त्यावर देशमुख हे 'नाय नाय फेल जण्यासारख नाहीच ते' असे म्हणाले. तेव्हा मी 'पोळ साहेबांच कसय बोलण्यावरन त्यांनी ते विश्वास दिलाय विश्वास ठेवुन एवढी मोठी रक्कम देतोय' असे बोललो. त्यावर देशमुख हे 'नाय नाय हायला प्रॉब्लेम नाही येणार, मी पण नावाला बांधील राहणार' असे म्हणाले. तेव्हा मी ' बरोबर... तुम्ही आणि पोळ साहेब म्हणजे ही जे सुरवातीला तीन कोटींची जी आहे डिमांड त्यात तुम्ही दोघचय का अजुन कुणी आहे.' असे विचारले. त्यावर देशमुख हे 'नाय दुसर कोणी नाय' अस म्हणाले. तेव्हा मी 'आणि मग पुढच्या हयाच्यात कोणय... 5 कोटीला' असे विचारले. त्यावर देशमुख यांनी 'साहेबच' असे सांगितले. तेव्हा हौसरे साहेब आणि दुसरं कोणी आहे काय' असे सांगितले. त्यावर देशमुख यांनी'त्यांच्या वर असत, डीडीआर च पण हे आपल्याला घ्याव लागत ना.... त्याच्यावर एक साहेब' असे म्हणाले. त्यानंतर देशमुख व माझेमध्ये माझे कामाबाबत, सभासदांचे अर्जाबाबत चर्चा झाली. नंतर मी लाच रक्कम ठेवलेली बॅग देशमुख यांचेकडे दिली. ती बॅग देशमुख यांनी दोन्ही हाताने घेवून त्याचे कव्हर उघडून आतील नोटा पाहिल्या व मला 'हयाच्यात राहु द्या' असे म्हणाले. तेव्हा पोळ हे मला 'तिथच ठेवा' असे म्हणाले. तेव्हा मी देशमुख यांना ' हे आहेत 30 लाख रुपये..आणि आता' असे म्हणून लाच रक्कमेची पिशवी त्यांचेकडे दिली. त्यांनी ती पिशवी दोन्ही हाताने स्विकारुन पाटीमागील सिटवर बसलेल्या पोळ यांचेकडे दिली. पोळ यांनी ती पिशवी दोन्ही हाताने स्विकारुन मधल्या सिटवर ठेवली. तेव्हा मला लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याकरीता वाव मिळावा म्हणून मी पंचास गाडीतून उतरण्यास सांगितले. तेव्हा आमचेमध्ये बोलणे चालू असताना मी पोळ यांना 'पोळ साहेबांनी 3 कोटिंची मागणी केली. मी बार्गेनिंग पण नाही केली विचारा-----केल का बार्गेनिंग' असे विचारले. तेव्हा पोळ यांनी 'नाय नाय' असे म्हणाले. त्यानंतर आमचेमध्ये पुढील कामाबाबत चर्चा झाली व मी गाडीत बसलेलो असताना माझे डोळयावरील चष्मा डोक्यावर घेवून पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. अशी हकीगत दोन्ही पंचासमक्ष सांगितली. तसेच पंच क्र. 1 यांना विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की ते गाडीत बसून तक्रारदार व लोकसेवक देशमुख व पोळ यांचे संभाषण ऐकत होते व तक्रारदार व लोकसेविक यांचेकडे बघत होते असे सांगितले. लोकसेवक देशमुख यांनी लाच रक्कमेची पिशवी स्विकारुन ती मागे बसलेले लोकसेवक पोळ यांचेकडे दिली. लोकसेवक पोळ यांनी ती स्विकारुन ते बसलेल्या सिटवर सदरची लाच रक्कम असलेली पिशवी ठेवताना पाहिलेचे सांगितले. सदर झाले कारवाईचा पडताळणी व सापळा पंचनामा सविस्तरपणे करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेवक 1) विनोद माणिकराव देशमुख, वय 50 वर्षे, धंदा शासनाच्या सहकार विभागाकडून नेमणुक केलेले अवसायक, पत्ता- फ्लॅट नं. 505, सिंहगड दर्शन सोसायटी, वडगाव खुर्द, धायरी फाटा, पुणे व 2) भास्कर राजाराम पोळ, वय 56 वर्षे, धंदा सरकारी पॅनलवरील ऑडीटर, पत्ता- सुश्रुत रेसीडेन्सी, बी-7, गजानन महाराज मंदिराजवळ, न-हेगाव, पुणे यांनी तक्रारदार हे एकता सहकारी सोसायटी सर्वे नंबर 10/1अ/2/3/4 धनकवडी पुणे या सोसायटीचे नवीन सभासद आहेत तक्रारदारांसोबत इतर 32 नवीन सभासद आहेत की ज्यांनी 2005 मध्ये जुन्या सभासदाकडून नमूद सहकारी सोसायटीचे शेअर विकत घेऊन नवीन सभासदत्व घेतले होते. सदरची सहकारी सोसायटी ही सहकार विभागाकडून लिक्वीडेशनमध्ये काढण्यात आलेली असून, त्यावर लोकसेवक विनोद माणिकराव देशमुख यांची अवसायक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामध्ये तक्रारदार व इतर 32 यांना त्यांचे नावे शेअर सर्टीफिकेट मिळण्यासाठी नमूद सहकारी सोसायटीचे तत्कालीन प्रशासक असलेले भास्कर पोळ यांनी स्वत: व अवसायक यांच्यासाठी 3 कोटी रुपयाची व लिलाव टेंडर प्रक्रीयेमध्ये तक्रारदार सांगतील त्या व्यक्तीस टेंडर देण्यासाठी 5 कोटी रुपये असे एकुण 8 कोटी रुपयाची लाच मागणी केली व त्यापैकी अँडव्हान्स म्हणून 30 लाख रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली व सदरची लाच रक्कम तक्रारदार यांचे मयुरेश असोसिएट्स, कानडेवाडा, शेजारील विनायक ज्वेलर्स समोर, 454 शनिवार पेठ, पुणे समोरील सार्वजनिक रोडवर लोकसेवक विनोद माणिकराव देशमुख यांचे स्वत:च्या मालकिच्या इर्टिगा कार क्र. एम.एच. 12 आर.एफ.6526 ही मध्ये 18.55 वा स्विकारली. त्या लाच रक्कमेमध्ये 500/- रु. दराच्या भारतीय चलनातील 200 नोटा एकुण रक्कम रू. 1,00,000/- व उर्वरीत 500/- दराचे नोटांप्रमाणे दिसणा--या 100 नोटांचा एक बंडल याप्रमाणे खेळण्यातील नोटांचे एकुण 58 बंडल अशी 30,00,000/- लाच रक्कम विनोद माणिकराव देशमुख व भास्कर राजाराम पोळ यांनी स्विकारलेबाबत यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली. म्हणून लोकसेवक 1) विनोद माणिकराव देशमुख, वय 50 वर्षे, धंदा शासनाच्या सहकार विभागाकडून नेमणुक केलेले अवसायक, पत्ता- फ्लॅट नं. 505, सिंहगड दर्शन सोसायटी, वडगाव खुर्द, धायरी फाटा, पुणे व 2) भास्कर राजाराम पोळ, वय 56 वर्षे, धंदा सरकारी पॅनलवरील ऑडीटर, पत्ता- सुश्रुत रेसीडेन्सी, बी-7, गजानन महाराज मंदिराजवळ, न-हेगाव, पुणे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन 30,00,000/- रुपये लाच रक्कम स्विकारली आहे तसेच म्हणून माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7 अ अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील फिर्याद जबाब माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यता आलेला असून, तो माझे सांगणे

प्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
PRADEEP VASANT KASABE(I (Inspector)) / PCPN74731 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
[signature] 06|12|2025

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]
ठाणे अंमलदार
विश्रामबाग पोलीस ठाणे,
पुणे शहर.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRADEEP VASANT K.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCPN74731

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification (s) (ओळखीच्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (पोषाखाच्या |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | Others (इ |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives** any one **more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक रकान्यांची नोंद घेतली जाईल.)